# समर गीतें

८३
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा'वा
दा. क्र. १०३२२



इन्दिरा प्रकाशन : : राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई

दा.क्र. 90322

# समरगीतें

म्यु. मराठी विभाग क्र. २० मधील शाळांतील विभागाधिकारी व शिक्षक—शिक्षिका यांनीं रचलेल्या समरगीतांचा संग्रह.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 90322 नों. दि. ........
वि. बा: वा ...... क्र. ........
38095
बालवाङ्मय
30
20/3/68

मार्गदर्शक : तु. ता. सावंत, एम्. ए.; एम्. एड्.

संपादक : वा. धों. सावंत.
पुं. धों. शेणवी.
वि. भै. हर्डीकर, मराठी साहित्याचार्य
सौ. आशा बोडस.

प्रथमावृत्ति : मार्च १९६३

इन्दिरा प्रकाशन : : राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई

मूल्य ५० नये पैसे

# संपादकीय

आमचे शिक्षणप्रिय व साहित्यिक विभागाधिकारी श्री. तु. ता. सावंत यांच्या प्रेरणेनें व मार्गदर्शनानें आमच्या विभागाच्या शाळांतील शिक्षक–शिक्षिकांच्या समरगीतांचा एक हस्तलिखित अंक आम्हीं तयार केला. त्या अंकाचें मुंबई–पुण्यांतील बहुतेक अग्रेसर वर्तमानपत्रांनीं चांगलें स्वागत केलें. महाराष्ट्र राज्याच्या प्रसिद्धीखात्याकडेहि आम्हीं आमचीं समरगीतें पाठविलीं. या गोष्टींनीं आमचा हुरुप वाढला व आणखी थोड्या समर-गीतांची भर घालून हा समरगीतांचा संग्रह आम्हीं तयार केला आहे.

आमच्या या काव्यसंग्रहाला आपल्या महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री नामदार दादासाहेब कन्नमवार यांनीं आपला स्फूर्तिदायक संदेश दिला व मराठी साहित्य संमेलनाचे भूतपूर्व अध्यक्ष प्रा. अनंत काणेकर यांनीं पुरस्कार लिहिला, हें आम्हीं आमचें परम भाग्य समजतों. या थोर प्रतिभावंतांचे आम्हीं कायमचे ऋणी आहोंत.

इंदिरा प्रकाशनाच्या चालकांनीं ‘ समर–गीतें ’ प्रकाशित करून आम्हांला उपकृत केलें आहे. त्याबद्दल आम्हीं त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. राष्ट्रवैभव प्रिंटिंग प्रेसनें अगदीं थोड्या वेळांत सुबक छपाई केल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

समरगीतें प्रकाशित होण्यासाठीं सौ. आशा बोडस, श्री. तु. स. सावंत व आमच्या मित्रांनीं जें सहाय्य केलें त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतों.

समरगीत संग्रहासाठीं ज्यांनीं आपलीं गीतें आम्हांला स्वखुशीनें व कांहीं मोबदला न घेतां दिलीं त्या सर्वांचे आम्हीं अत्यंत ऋणी आहोंत. आमचे विभागाधिकारी श्री. तु. ता. सावंत, यांच्या मार्गदर्शनाबद्दल आम्हीं त्यांचे कितीहि आभार मानले तरी ते थोडेच होतील.

समरगीतांबद्दल मिळालेलें मानधन राष्ट्रीय संरक्षण निधीस देण्यास आम्हांस अत्यंत आनंद होत आहे.

या समरगीतांचे स्वर घराघरांत आणि शाळाशाळांत निनादोत हीच इच्छा !

—संपादक मंडळ

महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री

# ना. कन्नमवार यांचा शुभ संदेश

सचिवालय, मुंबई ३२
६ मार्च १९६३

चीननें भारतावर जें आक्रमण केलें त्यामुळें सारा देश खडबडून जागा झाला आहे. भारतांत पूर्वीं कधीं नव्हती एवढी एकजूट आज निर्माण झाली आहे. युद्धप्रयत्नांना विविध प्रकारांनीं समाजांतील निरनिराळ्या थरांतील लोक मदत करीत आहेत. या प्रयत्नांत शिक्षकांनीं व विद्यार्थ्यांनींहि आपला वांटा उचलेला आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. मुंबई म्युनिसिपल मराठी विभाग क्रमांक २० मधील शाळांतील शिक्षक–शिक्षिकांनीं काढलेला समरगीतांचा हस्तलिखित अंक मीं पाहिला. तो पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत यावयाचा असून पुस्तकांचें येणारें मानधन राष्ट्रीय संरक्षण निधीसाठीं देण्यांत येणार असल्याचें वाचून मला आनंद वाटला. " समरगीतें " या संग्रहांतील गीतें लिहिणाऱ्या शिक्षक–शिक्षिकांचे व तो तयार करतांना ज्यांनीं विविध प्रकारें परिश्रम घेतले त्या सर्वांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों.

या समरगीतांकडून आबालवृद्धांस स्फूर्ति प्राप्त होवो अशी शुभेच्छा मी व्यक्त करतों व या पुस्तकाच्या प्रकाशनास मी आपले शुभाशिर्वाद पाठवितों.

—मा. सां. कन्नमवार

# पुरस्कार

सामाजिक जाणीव तीव्र होण्याच्या दृष्टीनें समूह गीत गायनाचें बाळकडू मुलांना लहानपणापासून मिळणें आवश्यक आहे. आपल्या समाजांत समूह-गीत गायनाची पद्धति अजून तितकीशी रूढ झालेली नाहीं. या युद्ध काळांत तर अशा प्रकारची तीव्र जाणीव निर्माण करण्याची फारच आवश्यकता आहे. मुलांच्या तोंडीं बसलींच तर सिनेमाचीं गाणीं बसतात. त्याची जबाबदारी अर्थात् चांगलीं समूह गीतें वा समरगीतें त्यांना न देणाऱ्या आम्हां प्रौढांचीच आहे. म्हणूनच मुंबई नगरपालिका मराठी विभाग क्र. २० मधील शिक्षकशिक्षिकांनीं तयार केलेल्या समरगीतांचा हा संग्रह अगदीं योग्य वेळीं प्रसिद्ध होत आहे असें म्हटलें पाहिजे. मुलांचें मन जाणणाऱ्या व्यक्तींनींच हीं गीतें केलेलीं असल्यामुळें हीं फारच सरस व परिणामकारक झालीं आहेत. या कवि-कवियित्रींचें मीं मनःपूर्वक अभिनंदन करतों.

अनंत काणेकर
६।३।६३

---

## अनुक्रमणिका


१ शूर शिपाई व्हावें ! ५
२ काय सांगतो आज हिमालय ! ६
३ विजया मिरवूं करी ! ८
४ भारतभूचा जयजयकार ! ९
५ ऐका भारत गान ! १०
६ आम्हीं सैनिक होणार ! १२
७ सत्यमेव जयते १३
८ जागा झाला नवजवान ! १४
९ भारत जागा झाला १५
१० दैत्यांना आव्हान ! १६
११ निश्चयी तलवार १८
१२ चला उठा ! १९
१३ काय समजतां तुम्हीं २०
१४ शूर जवान शूर जवान २१
१५ परत आला तर २२
१६ पुढचें पाऊल पुढेच टाका २४
१७ हिमालयाचा अभिमान २६
१८ स्वतंत्र हिंदुस्तान २७
१९ जिद्द आमुची २८
२० आम्हीं भारत नौजवान २९
२१ चीन ३०
२२ समरगीत ३१
२३ चल गड्या हिमालयावरी ३२

# शूर शिपाई व्हावें !

मला वाटतें आजच आपण शूर शिपाई व्हावें,
हिमालयाच्या पलिकडल्या त्या शत्रूला मारावें ॥ १ ॥
मला वाटतें राणी व्हावें झांशीची मर्दानी,
राखाया स्वातंत्र्य लढावें जाऊन रानोरानीं ॥ २ ॥
मला वाटतें आपण व्हावें बाजिप्रभू बांदलचा,
देश-देव राखायासाठीं लढा लढूं निकराचा ॥ ३ ॥
मला वाटतें आपण व्हावें मुरारबाजी वीर,
शीर उडालें तरी करावें चिन्यांना निर्वीर ॥ ४ ॥
मला वाटतें आपण व्हावें तानाजी सरदार,
शत्रूचा गड सर करण्यास्तव सोडावें घरदार ॥ ५ ॥
मला वाटतें आपण व्हावें बाल शिवाजी शूर,
गनिमी कावा करुनि चिन्यांना मारावें बेजार ॥ ६ ॥
मला वाटतें आपण व्हावें चांदबिबी सुलताना,
पेकिंगच्या फौजेशीं लढावें युक्त्या करुनि नाना ॥ ७ ॥
मला वाटतें आपण व्हावें प्रतापराणा मानी,
चिन्यांची धुळदाण करावी हिमालयाच्या रानीं ॥ ८ ॥
मला वाटतें आपण व्हावें घटोत्कचासम धीट,
विशाल घेऊन रूप करावें चिनी फौजांचें पीठ ॥ ९ ॥
मला वाटतें बाहुबली तो आपण भीम बनून,
बकासुरासम चिनी–राक्षसा मारावें बुकलून ॥ १० ॥
मला वाटतें आपण व्हावें बलशाली हनुमान,
लंकेवाणी चीन करावा रातोरातीं दहन ॥ ११ ॥

—तु. ता. सावंत,
एम्. ए; एम्. एड्.

# काय सांगतो आज हिमालय !

भारत भूच्या स्वातंत्र्याचा,
अलंकार पृथ्वी मोलाचा,
असंरक्षित का ठेवायाचा ?
घाला घाली शत्रू निर्भय ।
काय सांगतो आज हिमालय ॥ १ ॥

युद्ध नव्हे वानगी दाविली,
भीषण समराचीच साउली
शुभ्र हिमावर छाया पिवळी
ठरू न द्या, होऊनिया निर्भय,
काय सांगतो आज हिमालय ॥ २ ॥

कोट करुनिया इथें उभा मी,
रिपुनें दिधली संधी नामी
जागृतिची ही अफाट ऊर्मी,
परतवील हें संकट; कां भय ?
काय सांगतो आज हिमालय ॥ ३ ॥

सुखासीनता ग्रासी तरुणां ।
उदासीनता चारि दिशांना
रिपुदमनाच्या ह्या आव्हाना
स्वीकारा व्हा तुम्ही तेजमय ।
काय सांगतो आज हिमालय ॥ ४ ॥

सुसज्ज सीमा सदा असूं द्या,
शस्त्रागारें सिद्ध होऊं द्या
सावधानता ब्रीद बनूं द्या
वदनिं असूं द्या मंत्र शांतिमय।
आज सांगतो हेंच हिमालय ॥ ९ ॥

—सुशीला कृ. कानडे.
मुख्याध्यापिका गिरगांव व्हो. क्र. १

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# विजया मिरवूं करीं !

हिमालय अमुचा—अमुचा उंच जगीं। अम्हांला भीति नव्हति खरी ॥ धृ० ॥

आज आमुची भीति ठरली।
लक्ष न दिधलें स्वतंत्र कालीं।
उन्नति करण्या शक्ति वेंचिली।
स्निग्ध जाहला अरी। अम्हांला भीति नव्हति खरी ॥ १ ॥

शत्रु अमुचा मित्रच होता।
एक दिलानें चालत होता।
जगांत त्याची पत वाढवितां
नव्हतें अमुच्या उरीं। अम्हांला भीति नव्हति खरी ॥ २ ॥

पीत वर्णी हे कृतघ्न ठरले।
मित्रत्वाचें नातें तुटलें।
आज जगाला दिसून आलें।
हीन कृत्य हें तरी। अम्हांला भीति नव्हति खरी ॥ ३ ॥

भाई भाई म्हणुनि घोषणा।
केली आम्हीं एक मुखीं ना।
प्रचिति आली आज जरी ना।
विषाद नाहीं उरीं। अम्हांला भीति नव्हति खरी ॥ ४ ॥

घाला आला हिमालयावर।
सुपुत्र आम्हीं सज्ज निरंतर।
पिटून लावूं सीमेपार।
विजया मिरवूं करीं। अम्हांला भीति नव्हति खरी ॥ ५ ॥

—वा. धों. सावंत
उपमुख्याध्यापक, गिरगांव न्हो. क्र. १

# भारत भूचा जयजयकार !

करा पुकार, करा पुकार, भारत भूचा जयजयकार ॥ धृ० ॥

शूर विरांची पवित्र भूमि ।
आजवरी जी अखंड भूमि ।
होऊं पहाते खंडित भूमि ।
पहावते कां ? तुमच्या नयनीं । तुमच्या शौर्या असो धिःकार ॥ १ ॥

मायभूमिचे पुत्र म्हणवितां ।
राष्ट्राचे नरवीर शोभतां
काल महात्म्य तुम्हीं जाणतां ।
चिनी शत्रूचा पाश तोडुनी । खुलें करा हें मुक्तद्वार ॥ २ ॥

भारत चीनी 'भाई भाई'।
वदुनि गेले तुमच्या ठायीं
आज तुडविती तुम्हांस पायीं
रुचतें कां ? हें तुमच्या हृदयीं । तुमच्या धैर्या असो धिःकार ॥ ३ ॥

उंच हिमालय अपुला रक्षक ।
चिनी जाहले त्याचे भक्षक ।
चकविण्यास ते होतील तक्षक ।
तुडवा त्यांना अपुल्या पायीं । हाच आपुला आज पुकार ॥ ४ ॥

कीर्तिमान हा जगतीं भारत ।
अपमानानें झाला प्रेरित ।
प्राशी परि धैर्याचें अमृत ।
हीच प्रतिज्ञा नरविरांनो । सदैव गर्जत करा पुकार

**—मा. ब. सातवे.**
शिक्षक, गिरगांव व्हो. क्र. १

# ऐका भारत गान !

ऐका भारत गान, चिन्यांनो !
ऐका भारत गान ॥ धृ० ॥

उच्च येथली असे संस्कृती
उदार देखा आमुची वृत्ती
विद्वानांची येथें वस्ती
गंगा यमुना इथें वाहती
फुलवित आत्मज्ञान ॥ १ ॥

संत येथले, इथले पंडित
भारत झाला त्यानें मंडित
जरी आज हा वाटे खंडित
जगताची ही पूर्वीं वसते
आध्यात्माची खाण ॥ २ ॥

जवान अमुचे, अमुचे नेते
दर्शक अमुचे, अमुचे श्रोते
कुटुंब अमुचे मानित मोठें
हिंसेचें गाडिती मढें हें
समतेला आव्हान ॥ ३ ॥

हूणहि गेले कुशही गेले
घोडे अटकेचें जल प्याले
अनंत वीराग्रणी शोभले
नेफामध्यें वीर शोभती
अमुचे आज जवान ॥ ४ ॥

आजवरी जे भाई मानले
पंचशिलेचे मंत्र गायिले
लडाखमध्यें शत्रु जाहले
हिमालयावर बर्फ पेटला
घेईल आतां जान ॥ ५ ॥

ऐका आतां पुढें याल जर
खचेल धरणी पिचेल अंबर
धाउनि येतीं ब्रह्मा-हरि-हर
अतां चिन्यांनो, पळा येथुनी
होईल निःसंतान ॥ ६ ॥

—वि. भै. हर्डीकर
मराठी साहित्याचार्य

# आम्हीं सैनिक होणार !

रोज कवायत करणार। भारत विजयी होणार ॥ धृ० ॥

करूं चिन्यांना बेजार। भारत भूमीचे वीर।
युद्ध करूनी घनघोर। भारत विजयी होणार ॥ १ ॥

कष्ट करूं देशासाठीं। एक होऊं चाळीस कोटी।
हिमालयास्तव लढणार। भारत विजयी होणार ॥ २ ॥

खाऊ नको अन् खेळ नको। चैनिचे कपडेहि नको।
दौलत सैन्यां देणार। भारत विजयी होणार ॥ ३ ॥

जिद्द खेळते रक्तांत। आम्हां मराठी लोकांत।
घेतील शत्रु माघार। भारत विजयी होणार ॥ ४ ॥

शक्ति असुच्या हातांत। आम्हां पाठी यशवंत।
देई भवानी तलवार। भारत विजयी होणार ॥ ५ ॥

परतुनि लावूं शत्रूला। स्वतंत्र ठेवूं हिमाचला।
लढवय्या मी होणार। भारत विजयी करणार.

—आशा बोडस.
उपशिक्षिका, गिरगांव व्हो. क्र. १

# —सत्यमेव जयते—

कपट नीतीचा मार्ग स्विकारून, युद्ध सज्ज होऊं।
अशा तऱ्हेची नीति तुमची, हा भारत घेऊं॥

कपट वृत्तिची जाणीव नाहीं, कारण भाऊ भाऊ।
पंचशिलाचा बळी घेउनि, शांत दिसे चाऊ॥ १॥

लाल चिन्यांनो, कपटी कावा, कळला आम्हां जेव्हां।
सर्वस्वाचा त्याग करावा, असें ठरविलें तेव्हां॥

तुम्हीं लागलां हिमालयाचें भक्षण करण्या जेव्हां।
आम्हीं जाहलों सज्ज तयाचें रक्षण करण्या तेव्हां॥ २॥

भाई भाई गर्जत होतों, आम्हीं तुमच्यासंगें।
आतां आम्हां कळलें नातें नको असुरांसंगें॥

एकच नातें तुम्हांस ठावें, हुकूमशहाचे बंदे।
नीच वृत्तीचे चाऊ माऊ, करिती मुक्तियुद्धें॥ ३॥

तत्त्व युद्ध हें असे यादवी शक्ति तुमच्या पाठी।
सत्य, अहिंसा, भगवंताची भक्ति अमुच्या पाठीं॥

तुमची शक्ति अजिंक्य नाहीं, दावूं तुम्हां पुरते।
भारत भूचा विजय शेवटीं 'सत्यमेव जयते'॥ ४॥

—ज. ज. पाटील
शिक्षक, वि. प. रोड अ. प्रा.

# जागा झाला नवजवान !

जागा हो  ऽऽऽ
जागा हो ऽऽऽ
नवजवान— नवजवान— नवजवान— ॥ ध्रु० ॥

भारतमाता स्वतंत्र झाली ।
संकटछाया आज पसरली ।
फडकवुं झेंडा या समयीं ॥ १ ॥

चीनी शस्त्रें धरुनी हातीं ।
हिमालयावर तुटून पडती ।
लाज राखण्या हो तूं पुढती ॥ २ ॥

बाल बालिका शूर जवान ।
जय जय भारत गर्जा गान
एक दिलानें द्या हो प्राण ॥ ३ ॥

प्रांतियता ती नष्ट करा ।
देशहिताची कांस धरा ।
मानवतेचा मंत्र स्मरा ॥ ४ ॥

एक दिलाचे चाळीस कोटी ।
चिनीं शत्रू परतवूं पाठीं
करा–करा–त्या वज्रमुठी ॥ ५ ॥

—भास्कर पाटील
शिक्षक, गिरगांव अ. प्रा. क्र. २

# भारत जागा झाला

जागा झाला भारत सारा ऐका हें जयगान
मर्द आमुचे सज्ज जाहले उभवुनि उंच निशाण ॥ धृ० ॥

शुभ्र हिमालय रक्षक आपुला
शूरांच्या रुधिरानें भिजला
संपूं न शके परी तयांच्या नसांमधिल अभिमान ॥ १ ॥

भारत भूला रक्षायास्तव
चाळीस कोटी उठला मानव
तयार झाला द्याया अपुल्या प्राणाचें ही दान ॥ २ ॥

निश्चय आतां एकचि ठरला
प्रथम खडे चारूं शत्रूला
पीत दानवा नमवूं त्याची उडवुनियां धुळदाण ॥ ३ ॥

आश्वासन तुज भारतमाते
खेंचुनि आणूं विजयश्रीतें
कोटि मुखांतुनि क्षणाक्षणाला गर्जूं तव यशगान ॥ ४ ॥

—द. बा. प्रभु.
शिक्षक, गिरगांव व्हो. क्र. १

# दैत्यांना आव्हान !

भारतभूच्या वीरपुत्रांचें दैत्यांना आव्हान ॥ ध्रु० ॥

ताठ आमुचा हिमनग माथा,
गंगा गाई पवित्र गाथा,
विशाल सागर सदा गर्जता,
अमृतमय ही इथली माती सांडूं हिच्यास्तव प्राण ॥ १ ॥

शकहूणांचें अघोर हल्ले,
प्राणपणानें अम्हीं लढविले,
शीर न अमुचें कधींहि नमलें,
हर्षासम सम्राट आमुचे भारतपूत महान् ॥ २ ॥

प्रतापराणा चितोडगडचा,
वसा घेउनी वनवासाचा,
पाठपुरावा केला अरिचा,
रक्त सांडुनी उभें राखलें अपुलें प्रिय निशाण ॥ ३ ॥

शूर शिवाजी कधीं न वांकला,
शत्रु जया थरकांप कांपला,
तोड न त्याच्या धवल यशाला,
सह्याद्रीच्या कडेकपारी आजहि गाती गान ॥ ४ ॥

भारतभूची करण्या दैना,
अब्दालीची आली सेना,
कवटाळोनी अमोल मरणा,
पानपतावर अब्दालीचें केलें निःसंतान ॥ ५ ॥

सीमेवरतीं आज नाचतीं,
भारतभूला गिळण्या बघतीं,
लाख पिशाच्चें पिवळीं, कपटीं,
तयार असतीं प्रलंयकारी अमुचे शूर जवान ॥ ६ ॥

थोर देश हा शूर वीरांचा,
दिव्य असे इतिहास आमुचा,
पानापाना फुटेल वाचा,
कणाकणांतुनि या धरतीच्या उठतील लाख जवान ॥ ७ ॥

—तु. ता. सावंत
एम्. ए.; एम्. एड्

अनुक्रम ३०७९६
विभाग वा.वा
क्रमांक ३०५५
नों. दि. २०/४/८३

# निश्चयी तलवार

आतां चालू दे तलवार ॥
भारतभूच्या स्वराज्याला, तुझा असे आधार ॥ धृ० ॥

परवशतेच्या पाशामधुनी ।
मुक्त करुनी भारत जननी ॥
धन्य ! हुतात्मे गेले निघुनी ।
तुजवरी टाकुनी भार ॥ आतां० ॥ १ ॥

देश तुझा हा वैभवशाली ।
दीन-दुबळ्यांचा हा वाली ॥
लुटुं पाहतो, पहा जवळी
कृतघ्न अनिवार ॥ आतां० ॥ २ ॥

धैर्याची करीं अभंग ढाल ।
त्यागाचीं हीं वस्त्रें लाल ।
प्राण पणाला लावून चाल ।
निश्चयाची तलवार ॥ आतां० ॥ ३ ॥

असत्य अन्यायांना तुडवूं ।
परकी सत्ता मागें हटवूं ।
मरणालाही मारून जाऊं ।
हाच खरा निर्धार ॥ आतां० ॥ ४ ॥

—कृष्णनंदन
शिक्षक, बाणगंगा अ. प्रा.

# चला उठा !

चला उठा, चला उठा, तयार व्हा देशासाठीं लढण्याला ॥ धृ० ॥

छोटे छोटे जरी असलों ।
बाल शिवाजी तरी बनलों ।
रक्त उसळतें पहा कसें । देशासाठीं लढण्याला ॥ १ ॥

जोर बैठका बहुत काढुनी
लाठी बंदूक घेऊं शिकुनी ।
तोफा गोळे बनवुं विमानें । देशासाठीं लढण्याला ॥ २ ॥

सैनिक बनलों छोटे छोटे ।
आक्रमणानें झालों वेडे ।
कपडे खाऊ नको नाटकें । तयार आम्हीं लढण्याला ॥ ३ ॥

चाँऊ चाँऊ करूनी आला चिनी ।
बंदुक मारू ठोऽठोऽकरुनी ।
हुसकावुनिया देऊं असे । परत धजती ना लढण्याला ॥ ४ ॥

—शान्ता देशपांडे
शिक्षिका, चर्नीरोड अ. प्रा. शाळा.

# काय समजतां तुम्हीं

काय समजतां तुम्हीं आम्हांला ?
भिऊं का तुम्हांला, अशा वेळीं ॥ १ ॥

असूं आम्हीं सारे रणवीर पुरे
दावूं तुम्हां खरें, आमुचें पाणी ॥ २ ॥

मातृभूमिसाठीं देह येथें सांडूं
अन्यायाशीं भांडूं जन्मोजन्मीं ॥ ३ ॥

शेजारी जाणोनी दिली ही ओसरी
म्हणोनी पसरी, पाय आतां ॥ ४ ॥

भक्षुनी मूषक मातलासी पुरा
दावीसी दरारा, आम्हां लागीं ॥ ५ ॥

उठा रे सिंहांनो ! जागे व्हा रे असे
पळवा हे ससे, रानोमाळ ॥ ६ ॥

आतां तुझ्या बाची कोण करी कींव
घेऊं तुझा जीव ! एका क्षणीं ॥ ७ ॥

—कृष्णनंदन
बाणगंगा अ. प्रा. शाळा.

# शूर जवान शूर जवान !

शूर जवान । शूर जवान ।
अम्ही तुझें गाउं गान
धन्य दिव्य त्याग तुझा
ताठ आमुची ही मान ॥ १ ॥

शूर जवान ! शूर जवान !
गाउं तुझें शौर्यगान
धन्य शौर्यसागरा ?
असुचा तूं स्वाभिमान ॥ २ ॥

शूर जवान ! शूर जवान ।
गाउं तुझें समरगान.
धन्य रणधुरंधरा !
आमुचा तूं पंचप्राण ॥ ३ ॥

शूर जवान ! शूर जवान !
गाउं तुझें शक्तिमान.
दुष्ट चिनी लोळवीं !
आधार तूं अम्हां महान ॥ ४ ॥

शूर जवान ! शूर जवान !
अम्ही तुझें गाउं गान.
धन्य धन्य देश हा !
शूर वीरांची ही खाण ॥ ५ ॥

—तु. ता. सावंत
एम्. ए.; एम्. एड्.

# परत आला तर

अग कमल
नमन कर
जाग आली
भारत भर

चल चल बाळा
पायांत वाळा
चिनी पहा
आंतून काळा

मामा आला
मामी आली
भारत चीन
लढाई झाली

धुवून पुसून
साफ साफ
नेहमीं म्हणे
करा माफ

सगळे जण
अंगणांत जमूं
भारत मातेची
गाणीं गाऊं

पहाट झाली
भैरू उठला
चाऊ माऊ
कोण कुठला

मुलांची जमली
अंगणांत फौज
चिनी पळतो
मुलांची मौज

अंबू चंपू
अंगणांत खेळती
जवानां पुढें
चिनी पळती

टुणकन् विटी
कौलावर गेली
चिनी फौज
भिऊन पळाली

परत आला
जर चिनी
करूं त्याला
पार आम्हीं

—वि. भै. हर्डीकर
मराठी साहित्याचार्य

# पुढचें पाऊल पुढेंच टाका !

झडल्या भेरी, झडती नौबती पुढचें पाऊल पुढेंच टाका ॥ धृ० ॥

भारत माता स्वतंत्र झाली
पंचदिशामधीं विकसित झाली
तिच्या जीवनीं रसरसली ही
उन्मेशाची लाट ॥ १ ॥

या मातेची घेण्या अब्रू
टपले असती चाऊ-माऊ
निर्भयतेनें त्यांना दाऊं
अहिंसक भारती शान ॥ २ ॥

भौतिक जीवना चटावलेल्या
मानवी रक्त पिपासू लोकां
धडा गिरविण्या वाटे सोपा
हिंसक क्रांति छान ॥ ३ ॥

आजवरी आले अन् गेले
किती आक्रमक नष्ट जाहले
भारताच्या सुपुत्रांनीं त्या
दिधली दहशत छान ॥ ४ ॥

आजवरी आल्या अन् गेल्या
किती संस्कृति, कित्येक शाखा
या साऱ्यांना पचवुनि आमुची
उभवे संस्कृति महान् ॥ ५ ॥

भारतीय संस्कृति मध्यें या
चंद्रगुप्त पौरसादि राजे
रक्षुनी जीवन मूल्यें आपुलीं
उभविती राष्ट्र महान् ॥ ६ ॥

भारतामध्यें महाराष्ट्र हा
चिरस्मरणीय कसा जाहला
ज्या शिवबांनीं रक्षुनी आमुचा
हिंदु धर्म अभिमान ॥ ७ ॥

गत दीड शतका मधुनी सारीं
हीन दीन जनता का झाली
ज्या गोऱ्यांच्या उसन्या शिदोरी
संतोषित हें ध्यान ॥ ८ ॥

शिकंदर, महंमूद, तैमूर, नादीर
आक्रमकांची एकच जात
परंतु या चिनी चाऊची तर
जात असे बेइमान ॥ ९ ॥

आलें आलें चिनी आक्रमण
धोक्यामध्यें असे हिमालय
बर्फामध्यें रक्त सांडती
आमुचे हिंदी जवान ॥ १० ॥

हिमालयावरी संकट येतां
झोप कशी या सह्य पर्वता
सह्याद्रिची सिंह गर्जना
यशवंती ठरणार ॥ ११ ॥

अशी आक्रमणें कित्येक येतील
सद्दी त्यांची सारी संपेल
कुंपण खाई शेत अशी ही
लाल बावटा खाण ॥ १२ ॥

सैनिकी आक्रमणें क्षण भंगुर
त्यांची सद्दी क्षणैक राहील
परंतु वैचारिक आक्रमण
भय त्याचें अनिवार ॥ १३ ॥

भारतीयांनो, सावधं ! सावध !
चिनी आक्रमक करितो सावध !
तन-मन-धन-अर्पूनिया सारे
रक्षा भारत शान ॥ १४ ॥

असंग, निर्भय सूत्र अहिंसा
सव्य साचीची धरूनी नम्रता
अमानवांचा पाडूनी फडशा
दूर करूं भू-भार ॥ १५ ॥

ऋषि-मुनींच्या या देशांत
उदासीन का केवळ श्रांत
भागा आलें कर्म करूनिया
राखा आपुला मान ॥ १६ ॥

—गं. रा. पितळे
शिक्षक, कांदेवाडी अ. प्रा.

अनुक्रम
विभाग
क्रमांक ३०५५
नों. दि. २०/३/६३

# हिमालयाचा अभिमान

भारतभूचीं तुम्हीं लेकरें । हा तुमचा मान ।
तिच्या रक्षणा द्यावें तुम्ही । जीवाचें दान ॥ धृ० ॥

हिमालयाची बूज राखण्या । बंधु उभे तुमचे ।
रक्त दान द्या, बळकट बनवा । बाहु तुम्ही त्यांचे ॥
भारतभूच्या रणवीरांचा । ठेवा अभिमान ।
रक्षण करण्या द्यावें तुम्ही । जीवाचें दान ॥ १ ॥

सुवर्ण लेणीं ऐवज तुम्ही । द्या आनंदानें ।
रणांगणीं तळपती आपुले । बंधु शौर्यानें ॥
त्या वीरांचा तुम्हां असूं दे । सदैव अभिमान ।
रक्षण करण्या द्यावें तुम्हीं । जीवाचें दान ॥ २ ॥

गंगामाई निशिदिनिं झटते । अविरत कष्ट तिचे ।
वाटचाल ती आहे तुमची । वारस तुम्हीं तिचे ॥
भारतभूला, रक्त कष्ट अन् । सुवर्ण द्या दान ।
हिमालयाचें रक्षण करणें । हा तुमचा मान ॥ ३ ॥

—सौ. आशा बोडस

# स्वतंत्र हिंदुस्तान !

स्वतंत्र हिंदुस्तान आमुचा स्वतंत्र हिंदुस्तान ॥
हिन्दभूमिच्या स्वातंत्र्यास्तव देऊं आम्हीं प्राण ॥ धृ० ॥

'भाई भाई' काल बोलले ।
आज आमुचे शत्रु जाहले ।
माय भूवरि करिती हल्ले निष्ठुर ते सैतान ॥ आमुचा स्वतंत्र० ॥ १ ॥

जवान आमुचे सीमेवरती ।
शत्रु हल्ले परतुनि देती ।
कोट छातिचा करुनी लढती, प्राणाचें बलिदान ॥ आमुचा स्वतंत्र० ॥२॥

सैनिक आमुचे शूर धुरंधर ।
शर्थ लढ्याची करिती निरंतर ।
धन कष्टाचे दान करोनी राखूं त्यांचा मान ॥ आमुचा स्वतंत्र ॥ ३ ॥

उठा बंधुंनो, उठा भगिनींनो ।
भारतवासी नागरिकांनो ।
सहाय्य त्यांना देउनि रक्षूं । भारतभूची शान ॥ आमुचा स्वतंत्र० ॥४॥

—सावित्रीबाई कसबेकर.
शिक्षिका, गिरगांव व्हो. क्र. १

# जिद्द आमुची

हिमालयासम जिद्द आमुची ।
भारतभूला भुषवायाची ।
जिंकुनिया उत्तुंग नभाला ।
नक्षत्रफुलांनीं नटवायाची ॥ १ ॥

प्रखरानलसम जिद्द आमुची ।
प्रकाशमय ही भू करण्याची ।
पंचप्राण हे जाळून घेउनी ।
तेज तियेला अर्पायाची ॥ २ ॥

खड्गासम ही जिद्द आमुची ।
रणांगणावर तळपायाची ।
रक्तस्नान तें घालुनि अरीला ।
तृषा तियेची शमवायाची ॥ ३ ॥

गरुडासम ही जिद्द आमुची ।
नील नभाला झडपायाची ।
पिवळ्या नागांना झडपुनी ।
मायभुमीला राखायाची ॥ ४ ॥

—तु. ता. सावंत
एम्. ए.; एम्. एड्.

# अम्हीं भारत नौजवान

अम्हीं भारत नौजवान । देशासाठीं देऊं प्राण
देशासाठीं गाऊं गान
भारतमाते करूं प्रणाम । अम्हीं भारत नौजवान ॥ १ ॥

अम्हीं बाल शिवाजी होऊं
अम्हीं राणी लक्ष्मी होऊं
अम्हीं जवाहरलाल होऊं
अम्हीं कॅप्टनलक्ष्मी होऊं
भारतमाते देऊं मान । अम्हीं भारत नौजवान ॥ २ ॥

नेफा लडाख तो घेऊं
तिबेटही अम्हीं घेऊं
चिन्यांस आम्ही पळवुनि आतां
यशोदीप लावूं
भारताची राखूं शान । अम्हीं भारत नौजवान ॥ ३ ॥

आम्हीं युद्धावर जाणार
आम्हीं कधींहि नाहीं भिणार
देशासाठीं देऊं जान
भारतमाते देऊं मान । अम्ही भारत नौजवान ॥ ४ ॥

—वि. भै. हर्डीकर
मराठी साहित्याचार्य

# " चीन "

चिनी म्हणाले आपण भाई।
असुचा भारत शांत राही ॥

तेच झाले, शत्रु आतां।
नेहरू म्हणती जा यशवंता।
महाराष्ट्राची झाली घाई।
चीनी भाई शत्रु होई ॥ १ ॥

रक्त दान कोणी केले।
बांगड्या आंगठ्या सारे दिले।
धान्य कपडे कमी नाही।
चीनी भाई शत्रु होई ॥ २ ॥

चीनी सारे कपटी होते।
भारत देशा माहीत नव्हते ॥

असत्य कृतीला थारा नाहीं।
अखेर भारत विजयी होई ॥ ३ ॥

—सौ. आशा बोडस.

# समर-गीत

चला उठा रे वाट पाहते रणभूमि तुमची
प्राण घ्यावया दास्य द्यावया
सिद्ध जाहला चीन जरी हा
देऊं नका रे तिळभर भूमि
चला उठा रे करा तयारी ॥ चला उठा० ॥ १ ॥

भारत भूमिचा प्राणरूप हा
भारत भूमिचें आभूषण हा
असे हिमालय असुचा असुचा
चला उठा रे रक्षुं तयाला ॥ चला उठा० ॥ २ ॥

हिन्दी चिनी भाई भाई
असत्य ठरली आज ही ग्वाही
भुलूं नका रे भलत्या थापा
चला उठा रे शौर्य गाजवा ॥ चला उठा० ॥ ३ ॥

असुरी चिन्यांच्या करा चिंधड्या
हिमालयाच्या तोडा बेड्या
मुक्त कराया चला तया
चला चला रे उठा चला ॥ चला उठा० ॥ ४ ॥

—निर्मला नातू
शिक्षिका, वि. प. रोड, अ. प्रा.

[library stamp] १०३२२ वॉ वा

# चल गड्या हिमाल्यावरी—

चल गड्या हिमाल्यावरी।
चल गड्या हिमाल्यावरी ॥

शत्रू जिंकण्या, देश रक्षणा।
हातीं बांध वीर—कंकणा ॥ चल गड्या० ॥

आठवा आपुली परंपरा।
आण तुला ही मावळ शूरा
खडे चारण्या शत्रूशीं।
घे हातीं आतां शस्त्राशीं ॥ चल गड्या० ॥

सह्याद्रीचा कणखर गडी तूं।
दाव आपुल्या पराक्रमा तूं
कृष्णा गोदेचें, पाणी पाजुनी शत्रु तें।
रक्ष रक्ष अपुल्या भारत मातेतें ॥ चल गड्या० ॥

—कुसुमावती वडके.
मुख्याध्यापिका वि. प. रोड अ. प्रा.

मुद्रक : जयराम दिपाजी देसाई, राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव-मुंबई ४
प्रकाशक : ज. दि. देसाई, इंदिरा प्रकाशन, राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव-मुंबई ४